બુધ
25/1/06

x ——— x ——— x ——— x ——— x ———

# પ્રકરણ 3 જું

## ① નિકોલો મેકિયાવેલી (1469-1527)

પ્રસ્તાવના:-

"મેકિયાવેલી ના મધ્યયુગના શેવટના વ આધુનિક યુગના પહિલા વિચારવંત હોય." મેકિયાવેલીયા ઉલ્લેખ આધુનિક રાજકીય વિચારોના જનક.

સ્મરણ કેલા જાતો. તથેચ મૅકેવલીની ત્યા યુગાચા શિશુ માટે. આગાઉ ત્યાચા ઉલ્લેખ કેલા જાતો. તો ઇટાલીયન વિચારવંત માટે. ત્યાચા જન્મ ઇટાલીમધીલ ફ્લૉરેન્સ યા નગરરાજ્યાત 1469 મધ્યે ઝાલા માટે. ત્યાચે વડિલ બર્નાર્ડો-ડી-નિકોલો હે વકીલ હોતે. ત્યાચે પ્રાથમિક શિક્ષણ ફ્લૉરેન્સ મધ્યે ઝાલે. ત્યાંની પૅરિસ, રોમ, બર્લિન યેથે પરરાષ્ટ્રીય વકીલ મ્હણૂનહી કામ કેલે આહે. વ શેવટી 1527 મધ્યે ત્યાચા મૃત્યૂ ઝાલા આહે.

(2) ગ્રંથસંપદા :- મૅકેવલીને અનેક ગ્રંથ લિહિલે અસલે તરી રાજ્યશાસ્ત્રાચ્યા દૃષ્ટીને ત્યાંચે ચાર ગ્રંથ મહત્ત્વાચે માટેત

1) દ પ્રિન્સ
2) દ ડિસ્કોર્સેસ
3) દ આર્ટ ઑફ વાર્ડ
4) દ હિસ્ટ્રી ઑફ ફ્લૉરેન્સ ઇ.

(3) પ્રભાવ :- ① તત્કાલીન ઇટાલીયન પરિસ્થિતી ચા પ્રભાવ.
2) નૈતિક અંધઃપતનાચા પ્રભાવ.
3) શક્તી સંપન્ન રાજસત્તેચા ઉદય.
4) ઍરિસ્ટૉટલચ્યા વિચારાચા પ્રભાવ.
5) કૌટુંબિક વાતાવરણાચા પ્રભાવ.

(4) અધ્યયન પદ્ધત :- મૅકેવલીની ધર્મ, ન્યાય, નિતી, કર્તવ્ય ઇ. વર આધારિત
① વિશ્લેષણાત્મક ② નિરીક્ષણાત્મક ③ તુલનાત્મક ④ ઐતિહાસિક પદ્ધતીચા સ્વિકાર કેલા. ત્યાચી હી

पद्धत ॲरिस्टॉटल, मॉन्टेस्क्यू, हेगेल इ. विचारवंतांच्या अध्ययन पद्धती भारतीय आहे मॅकेव्हलीच्या विषया-चा मुळ पाया मानवी स्वभाव हाच होता.

## (5) imp मॅकेव्हलीचे राजकीय विचार :-

imp 10mark

(1) मनुष्याच्या स्वभावासंबंधीच्या विचार :- मॅकेव्हलीने 'द प्रिन्स' या ग्रंथामध्ये मानवी स्वभावासंबंधीचे विचार मांडले आहेत. मॅकेव्हलीच्या संपूर्ण राजकीय विचाराचा केंद्रबिंदु म्हणजे मानवी स्वभावाचा विचारच होय. मानवी स्वभावाचा विचार निराशाजनक आहे. असा विचार मांडण्याचे कारण म्हणजे तत्कालीन इटालीयन समाजाची दुर्दशा, इटालीतील अनैतिक व अधार्मिक पुरुषी इ. सांगता येतील. या परिस्थितीचा परिणाम मॅकेव्हलीवर पडला आणि त्यांनी खालीलप्रमाणे मनुष्याच्या स्वभावाचे वर्णन केले.

(i) मनुष्याचा स्वभाव स्वार्थी व दुर्गुणी आहे :- त्याच्या मते मनुष्याचा जन्मतः स्वभाव स्वार्थी, दुष्ट, पापी, कपटी, अमित्र, नसेच संपत्तीचा लोभी आहे त्याच्यामध्ये चांगुलपणा नावालाही नाही. इ. दोष मनुष्यात असल्यामुळे त्याच्या वर्तनावर योग्य नियंत्रण अभावे त्याला स्वइच्छेनुसार कार्य करण्याचे स्वातंत्र्य दिले तर अव्यवस्था, अराजकता निर्माण होईल. कारण मनुष्य चांगल्या गोष्टीपेक्षा वाईट गोष्टीकडेच अधिक आकर्षित होतो.

2) स्व स्वार्थासाठी कार्य :- मनुष्य सर्व कार्य स्वार्था-
ने प्रेरित होऊन व आभावर किंवा बळावर नज-
र ठेवूनच करतो. एखाद्या कार्यापासून त्याला फायदा
होत असेल तरच तो कार्य करतो. असे मॅकेव्हलीचे
मत आहे.

3) मनुष्य पशुसारखा आहे :- मॅकेव्हलीच्या मते मनु-
ष्य हा पशुसारखा आहे पशुप्रमाणे मनुष्य भय,
शक्ती आणि स्वार्थासाठी प्रेरित होऊन कोणतेही कार्य
करण्यास तयार होतो. म्हणूनच राज्यकर्त्याने मनुष्य
मुळात दुष्ट व वाईट आहेत हे गृहीत धरूनच राज्य-
कारभार करावा असा सल्ला त्याने शासकाला दि-
ला आहे. प्रत्येक मनुष्याचे चारित्र्य हे अनेक दोषांनी
भरलेले असते. म्हणून त्यावर योग्य नियंत्रण असणे
आवश्यक आहे.

4) मनुष्यावर कायद्याचे नियंत्रण :- मनुष्य स्वा-
र्थी, अहंकारी, आक्रमणशील आहे. अनेक गोष्टी-
च्या प्राप्तीसाठी तो लोकांशी स्पर्धा व संघर्ष करित
असतो. त्यामुळे त्यावर कायद्याचे नियंत्रण असावे.
कायद्याचे नियंत्रण नसेल तर अराजकता निर्माण हो-
ईल. असे मॅकेव्हलीचे मत आहे.

5) भितीमुळे राजाच्या आज्ञेचे पालन :- मॅकेव्हली-
च्या मते प्रेम आणि भिती या दोन शक्तीद्वारे-
च मनुष्याकडून कोणतेही काम करून घेतले जाऊ शकते
राजाबद्दल व्यक्तीच्या मनात भिती असावी जोप-
र्यंत लोक राजाला भित राहतील तोपर्यंत ते राज्या-
वर प्रेम करतील आणि राजाच्या आज्ञेचे पालन
करतील. म्हणून राजाने प्रेमापेक्षा भितीचाच वापर

करावा असे मॅकेव्हलीचे मत आहे
6) संपत्तीचा लोभ :— मनुष्य निसर्गतःच संप-
त्तीचा लोभी आहे. कायद्याही ती एक प्रेरक
शक्ती आहे. सातत्याने संपत्तीची भूक वाढत जाते.
मनुष्याच्या गरजा अमर्यादित असतात. मॅकेव्हली या
संदर्भात असे म्हणतात की, "माणसाला संपत्तीचा मोह
एवढ्या पराकोटीचा असतो की तो एखाद्या वेळी
आपल्या वडिलांचा मृत्यू विसरू शकतो. परंतू संपा-
त्तिक नुकसान किंवा संपत्तीतील आपला वाटा विस-
रू शकत नाही." त्यापेक्षा पुढची पायरी म्हणजे
तो वडिलांच्या खून करणाऱ्याला क्षमा करेल, परंतू
संपत्ती हिरावून घेणाऱ्याला क्षमा करणार नाही' म्हणू-
नच तो म्हणतो की, शासनाने एखाद्या व्यक्तीस
मृत्युदंड दिला तरी हरकत नाही. परंतू कोणाचीही सं-
पत्तीचे अपहरण करू नये.
7) शिक्षणामुळे सुधारणा अशक्य :— मॅकेव्हलीच्या
मते मनुष्य म्हणजे दुर्गुणांचा पुतळा आहे
त्यामध्ये शिक्षणानेही सुधारणा होत नाही. त्यासाठी
दंडशक्तीचा वापर करावा स्वार्थी प्रवृत्ती रोखण्या-
चा हाच एक मार्ग आहे असे त्यांचे मत आहे
अशाप्रकारे मॅकेव्हलीने वास्तवप्रमाणे मनु-
ष्याच्या स्वभावाचा विचार मांडला आहे या विचा-
राचा अभ्यास केल्यास आपणास खालीलप्रमाणे
निष्कर्ष काढता येतील.
(1) राज्य एक स्वाभाविक संस्था नाही
(2) सुरक्षिततेची आवश्यकता म्हणजे राज्य
(3) मनुष्याच्या प्रेरक शक्ती स्वार्थी आहेत.

(4) शासनकार्यात नैतिकता गौण.
(5) मनुष्याच्या वर्तमान सुधारणा मर्यादा.
(6) राज्यनितीची धर्म व नैतिकतेपासून फारकत इ.

* मनुष्यासंबंधीच्या विचारावर दोष :-

(1) एकांगी विचार
(2) सिमीत व संकुचित विचार
(3) शिक्षणाच्या विचार चुकीचा / अयोग्य
(4) राजा हा देखील एक मनुष्य
(5) असत्य विचार
(6) व्यावहारिकदृष्ट्या अयोग्य इ. दोष दिसून येतात.

Imp moment

(2) नैतिकता व धर्मासंबंधीचा विचार :- मॅकेव्हलीने सर्वप्रथम धर्म आणि नैतिकतेपासून राजकारणाची फारकत केली आहे म्हणून त्याला आधुनिक राजकीय विचाराचा जनक म्हटले जाते. कोणत्याही प्राचीन व मध्ययुगीन विचारवंतानी धर्म व नैतिकतेपासून राजकारणाची एवढी फारकत केली नाही. ॲरिस्टॉटलच्या विचारात हा भाग थोड्याफार प्रमाणात जाणवत असला तरी त्यानेही त्याची संपुर्ण फारकत केली नाही. म्हणूनच तर राज्यशास्त्राला नितीशास्त्राचा एक भागच मानले आहे. मार्सोलिओचे विचार मॅकेव्हलीच्या विचाराशी मिळते जुळते आहेत. कारण त्यांनी राज्य व चर्च यामध्ये चर्चला गौण स्थान दिले.

1) नैतिकतेसंबंधीचा विचार :- मॅकेव्हलीचा नैतिकतेसंबंधीचा विचार 'बळी तो कान पिळी', किंवा 'साध्य हेच साधनाचे औचित्य आहे'

Scanned with CamScanner

या म्हणीप्रमाणे आहेत. नैतिकतेला तो राज्याचा आधार मानावयाला तयार नव्हता. शासकाने साध्य प्राप्त करण्यासाठी वाटेल त्या नैतिक व अनैतिक साधनाचा उपयोग करावा. असे तो म्हणतो. साध्याकडून साधनाची किंमत ठरते. साध्याची सफलता साधनांना पवित्र बनविते असे मॅकेव्हलीचे मत आहे

मॅकेव्हलीने नैतिकतेचे दोन प्रकार सांगितले आहेत
① सामाजिक नैतिकता व राजाची नैतिकता.

(A) सामाजिक नैतिकता :- नैतिकतेचे पालन करण्याचा जनतेचे कर्तव्य आहे. कायद्याचे पालन करणे, राष्ट्रासाठी बलिदान देणे, सत्कार्य करणे समाजाच्या व राज्याच्या हितासाठी वैयक्तिक हिताचा त्याग करणे म्हणजे सामाजिक नैतिकता होय. जनतेसाठी / समाजासाठी अशा नैतिकतेची आवश्यकता आहे. जनतेनी त्याचे पालन केले पाहिजे

(B) राजाची नैतिकता :- मॅकेव्हलीने जनतेच्या नैतिकतेबरोबर राजाच्या / शासकाच्या नैतिकतेचाही विचार मांडला आहे. जनतेसाठी नैतिकता प्रत्यक्ष आवश्यक आहे. शासकासाठी नैतिकता आवश्यक नाही असे त्यांचे मत आहे. राजा / शासक पूर्ण स्वातंत्र्य आहे तो कोणत्याही नितीनियमाच्या बंधनाने बांधिल नाही, तो नितिनियमापेक्षा श्रेष्ठ असतो, त्याच्यासाठी नैतिक नियम नसतात, नैतिक नियम प्रजेसाठी असतात. नैतिक अनैतिक असे कोणतेही साधन राजासाठी न्याय आहे साध्य प्राप्त करणे हाच त्याचा एकमेव उद्देश असावा. त्यासाठी

Scanned with CamScanner

हिंसा, अत्याचार, हेरगिरी आदी कोणतेही साधन उचित ठरते. शासकांनी प्रजा राज्याच्या संरक्षणाची चिंता करावी. संरक्षणासाठी त्यांनी अत्याचार करावा, लोकांना धोका द्यावा व गरज लागले तरीही मागेपुढे पाहू नये असे मॅकेव्हलीचे मत आहे.

मॅकेव्हलीच्या मते शासक/राजा हा प्रत्येक सद्-गुणीच असावयास पाहिजे असे नाही. त्याच्या शब्दात सांगायचे झाले तर तो असे म्हणतो की, "कुशल शासक तो आहे, जो जनतेपुढे सद्गुणाचे ढोंग करतो." तसेच तो म्हणतो की, "राजा हा सिंहाप्रमाणे शूर पराक्रमी व कोल्ह्याप्रमाणे धूर्त कावेबाज असावा." राजा कितीही कपटी व धूर्त असावा की, "लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून आपण दया, श्रद्धा, प्रेम, धर्म याचे मूर्तिमंत प्रतीक आहोत असा त्यांनी भास निर्माण करावा. असे त्याचे मत आहे.

थोडक्यात चांगले-वाईट, धर्म-अधर्म, न्याय अन्याय, नैतिक-अनैतिक, इहलोक-परलोक हे विचार सामान्य मनुष्यासाठी आहेत. राजासाठी/शासकासाठी नव्हेत. वेळ पडल्यास राजाने छळ, कपट, बेईमानी, पक्ष-पात, हत्या, धोका, संधीसाधूपणा अशा कोणत्याही साधनाचा वापर करावा. साम, दाम, दंड, भेद याचा उपयोग करावा. प्रजेला दिलेले वचन पूर्ण करण्यात हित असेल तर ती पूर्ण करावी. वचनपूर्तीमुळे अहित होत असेल तर; निःसंकोचपणे वचनभंग करावा असे मॅकेव्हलीचे मत आहे.

नागरिकांनी परस्परांत विश्वासाचे संबंध ठेवावेत, शेजाऱ्यावर प्रेम करावे परंतु राजाने मात्र

शेजाऱ्यांपासून सावध रहावे. परिस्थितीनुसार शेजारी राष्ट्रांशी मित्रत्वाचे किंवा शत्रुत्वाचे संबंध ठेवावेत. योग्य संधी मिळताच शेजारी देशावर आक्रमण करून त्याचा प्रदेश जिंकावा. भावनेच्या आहारी शासकाने जावू नये. असे त्यांचे मत आहे. हीच त्यांची नैतिकता आहे.

★ धर्मासंबंधीचा विचार :—

① धर्मापासून राजाला मुक्त केले :— मॅकेव्हलीने नैतिकतेप्रमाणेच धर्माचीही राजकारणापासून फारकत केली आहे. मॅकेव्हली धर्म व नैतिकतेच्या विरोधी केंव्हाच नव्हता त्यांनी त्याची अवहेलना केली नाही परंतु राजाला / शासकाला धर्माच्या नियंत्रणापासून मुक्त केले आहे शासकाने धार्मिक असणे आवश्यक नाही. राज्याच्या हितासाठी धर्माचा उपयोग करून घ्यावा. असे मॅकेव्हली सुचवितो.

② तत्कालीन परिस्थितीचा परिणाम :— तत्कालीन इटलीतील धर्मव्यवस्था अधःपतित झालेली होती. धर्मगुरु धर्माच्या पवित्र नावावर जनतेस लुबाडीत होते. धर्माच्या नावाने अन्याय व अनिती सर्वत्र पसरली होती. धर्माचा राजसत्तेवर फार मोठा प्रभाव पडला होता. त्यामुळे धर्म व राजकारण यात विभाजन करून मॅकेव्हलीने राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ असल्याचे सांगितले.

③ राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे :— मॅकेव्हलीच्या मते राजा / शासक हा धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे धर्माचे राजसत्तेवर नियंत्रण असू नये राजसत्तेचे धर्मसंस्थेवर नियंत्रण असावे असे त्यांचे मत होते

(4) राजकारणासाठी धर्माचा वापर :- व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणारा धर्म हा एक महत्त्वाचा घटक आहे केवळ निती व दंडशक्तीच्या आधाराने राज्य टिकत नाही. आध्यात्मिक शक्ती आवश्यक आहे की, कायदा किंवा दंड यापासून अधूनमधून व्यक्ती दुवर्तन करत राहील. परंतु धर्माच्या नियंत्रणापासून तिची सुटका नाही. शासकाने धर्माचा वापर शांतता, सुव्यवस्था, स्थिरता निर्माण करण्यासाठी राजकारणामध्ये करावा असे त्यांचे मत आहे.

(5) धर्माचे प्रकार :- मॅकेव्हलीच्या मते धर्माचे दोन प्रकार आहेत (1) व्यक्ती धर्म (2) राज धर्म

(1) व्यक्तीधर्म - व्यक्तीधर्म प्रत्येकाने पालन करावा व्यक्तीची धर्मावर आत्मिक श्रद्धा असते. धर्म वैयक्तिक बाब असते. माणसाच्या इष्ट प्रवृत्तीवर धर्माद्वारेच नियंत्रण ठेवले जाते. ज्या धर्मामुळे राज्याचे हित होत असेल तो धर्म चांगला आहे. चांगल्या धर्माने राज्याने हस्तक्षेप करू नये. परंतु अधार्मिक बाबूवर नियंत्रण ठेवावे. जेव्हा धर्म अधर्म बनतो तेव्हा नियंत्रण गरजेचे असते. असे मॅकेव्हलीचे मत आहे.

(2) राजधर्म :- राजा किंवा शासक हा धर्मपिठाचा प्रमुख असतो. राज्याचे संरक्षण व राज्यहित हाच राजाचा / शासकाचा धर्म आहे. या ध्येयाप्रत जाणारा प्रत्येक मार्ग हा धार्मिक असतो असे मॅकेव्हलीचे मत आहे. राजाने / शासकाने उपयोगितेचा आधार घेवून धर्माचा किंवा अधर्माचा वापर करावा. थोडक्यात राजधर्म म्हणजे राज्याची ध्येयप्राप्ती आवश्यक असलेले कार्य असे त्यांचे [illegible]

(४) शांततेच्या काळात धर्मपालन :- मॅकेव्हलीच्या मते शांततेच्या काळात राजाने नैतिक व धर्म कल्पनेचा आवश्यक आदर करावा. धार्मिक कार्यात सहभागी व्हावे, त्यांना मदत करावी. परंतु राजाने/शासकाने धार्मिक मानू नये. शासकाने जनतेसमोर आदर्शरितीने वागावे की, प्रजेला राजा हा अत्यंत दयाळू, प्रजाहित दक्ष, शुद्ध आचरणाचा, प्रामाणिक, धार्मिक व नैतिक आहे असे वाटला पाहिजे. धर्माचा दिखावा हा राज्याच्या विनाशाचे लक्षण ठरू शकते.

मॅकेव्हलीच्या वरील निती व धर्मासंबंधीच्या कल्पनेमुळे तो अनैतिक व अधार्मिक विचारवंत आहे असा त्यावर आक्षेप घेतला जातो. परंतु तो यथार्थवादी/वास्तववादी विचारवंत असल्यामुळेच त्यांनी राजकारणाला या दोन्ही कल्पनापासून मुक्त केले त्याला धर्म व नितीचे महत्व माहित असूनही त्याने राजकारणाला त्यापासून मुक्त ठेवण्याचा प्रयत्न केला. आहे आधुनिक म्हणता येईल.

(3) 10 marks राज्यासंबंधीचे विचार :-

(1) राज्य एक कृत्रिम संस्था आहे :- प्लेटो, ॲरिस्टोटलनी राज्याला एक स्वाभाविक, नैसर्गिक संस्था मानले आहे तर मॅकेव्हलीने राज्याला कृत्रिम संस्था मानले आहे. राज्यसंस्था ही स्वाभाविक संस्था नाही. व्यक्तीने आपल्या असुविधा दूर करण्यासाठी राज्याची स्थापना किंवा निर्मिती केली आहे

आहे त्यांचे मत आहे.

(2) राज्य पूर्व अवस्थेकडून राज्याकडे :– मॅकेव्हरच्या मते जेव्हा समाजातील निर्माण झाला नव्हता व राज्याही निर्माण झाले नव्हते. म्हणून एक राज्य पूर्व अवस्था होती. त्या अवस्थेत अराजकता, संघर्ष होता. जिवनाची शाश्वती नव्हती, खाजगी संपत्ती नव्हती अशा या असमाजक अवस्थेला लोक कंटाळले त्यातील काही लोक एकत्र येवून सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी संघटनेची स्थापना केली. व त्या इच्छेनेच हळूहळू राज्याचा विकास झाला आहे. राज्याच्या उत्पत्तीचा किंवा उदयाचा दृष्टीकोनही स्वार्थीच होता असे त्यांचे मत आहे.

(3) राज्यहिताला प्राधान्य :– राज्य कृत्रिम व मानवनिर्मित संस्था आहे. ती समाजाचे सामान्य हित साधण्यासाठी निर्माण झाली आहे. हे मान्य केल्यास राज्य हिताला प्राधान्य द्यावे लागते, व्यक्तीहितापेक्षा राज्याचे हित प्रमुख आहे.

(4) राज्य सर्वश्रेष्ठ संस्था आहे :– राज्य मानवाच्या सर्व समुदायामध्ये सर्वश्रेष्ठ संस्था आहे. व्यक्तीचे मिळून राज्य बनल्यामुळे व्यक्तीच्या गुणासारखेच राज्याचे गुण असतात. राज्य सर्वाधिकारी संस्था असल्यामुळे राज्यापुढे व्यक्ती व इतर संस्था गौण आहेत. राज्याच्या हितामध्येच व्यक्तीचे व इतर संस्थेचे हित सामावले आहे असे मॅकेव्हरचे मत आहे.

(5) उत्क्रांती व अपक्रांतीचा इतिहास :– राज्याचा इतिहास हा त्याच्या उत्क्रांतीचा व अपक्रांतीचा किंवा अधःपतनाचा इतिहास आहे राज्य परिवर्तनशील

असल्यामुळे त्यामध्ये बदल होत जातो. बदलाचा एक निश्चित क्रम असतो. हा क्रम इतिहासाच्या अध्ययनातून सहज लक्षात येईल. त्यामध्ये उत्कर्ष व क्षय परत उत्कर्ष व क्षय असाच क्रम दिसून येतो.

(6) राज्याचे प्रकार :- राज्याचे (1) शक्तिशाली राज्य (2) दुर्बल राज्य असे दोन प्रकार पडतात.

शक्तिशाली राज्ये ही आक्रमक प्रवृत्तीचे असतात. त्यामध्ये युद्ध, संघर्ष करण्याचे धाडस असते. त्यामध्ये एकता व शौर्य असते. याउलट दुर्बल राज्ये युद्धाबद्दल उदासीन, कारभारावरून भांडणारी, एकता व सामर्थ्य नसणारी असतात. अशा राज्यावर आक्रमण करून त्यांच्यावर विजय मिळवणे सोपे असते असे मॅकेव्हलीचे मत आहे.

अशाप्रकारे त्यांनी वरीलप्रमाणे राज्याचा विचार मांडला आहे.

(5) राज्यांचे वर्गीकरण :- मॅकेव्हलीवर ॲरिस्टॉटल, पॉलिबियस, सिसरो व विचारवंताचा प्रभाव पडला आहे. ॲरिस्टॉटलप्रमाणेच मॅकेव्हलीने राज्यांचे वर्गीकरण करताना त्याचे तीन शुद्ध व तीन अशुद्ध असे सहा प्रकार सांगितले आहेत. त्यामध्ये शुद्ध प्रकारात राजतंत्र, कुलीनतंत्र, गणतंत्र यांच्यानंतर अशुद्ध प्रकारात एकतंत्र, धनिकतंत्र, समूहतंत्र यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

या सहा प्रकाराशिवाय मॅकेव्हलीने सातवा संमिश्र शासनाचा प्रकार सांगितला आहे. यामध्ये वरीलसर्व शासन प्रकारातील गुण घेतले जातात.

Scanned with CamScanner

ત્યામુળે યા શાસનાત દંડાચી સંતુલન વ દંડાચી નિયંત્રણ
સાધાલે જાતે.
મૅકિયાવેલીને આપલ્યા પ્રિન્સ યા ગ્રંથામધ્યે રાજની-
તીચે સમર્થન કેલે આહે. કારણ ત્યાવર તત્કાલીન ફ્લોરેન્-
ટીયન પરિસ્થિતીચા પ્રભાવ પડલા હોતા. યાવરૂન તો
રાજતંત્રાલા સર્વશ્રેષ્ઠ માનતો આહે નાહી કારણ ત્યાને
ડિસ્કોર્સેસ યા ગ્રંથામધ્યે ગણતંત્ર / ગણરાજ્યાલા સર્વ-
શ્રેષ્ઠ શાસનાચા પ્રકાર માનલે આહે કારણ યા ગણરા-
જ્યામધ્યે ① લોકાંના વિકાસાસાઠી સંપૂર્ણ વાવ આહેતો.
② સર્વાંના શાસનાત ભાગ ઘેતા યેતો
③ લોકાંના રાજકીય શિક્ષણ ઘેતા યેતે
④ લોકપ્રતિનિધીચ્યા હાતામધ્યે સત્તા અસતે.
⑤ સર્વાંચા સમાન સહભાગ હોણ્યાચી સંધી મિળતે.
⑥ આર્થિક વિષમતા કમી અસતે.
⑦ બહુમતાનુસાર નિર્ણય ઘેતલા જાતો.
⑧ ~~લોકપ્રતિનિધી~~ રાજતંત્રાપેક્ષા ગણતંત્રાત ભ્રષ્ટાચાર કમી આહે
અસા વિચાર ત્યાંની આપલ્યા ગ્રંથાત માંડલેલા આહે.

⑤ સાર્વભૌમત્વાસંબંધીચા વિચાર :- મૅકિયા-
વેલીને સ્પષ્ટ શબ્દાત સાર્વભૌમત્વાચા વિચાર માંડલા
નસલા તરી ત્યાપાસ્યા અધિકારાવરૂન સાર્વભૌમત્વાચા
આભાસ હોતો. રાજા / શાસક હા સર્વ નિયંત્રણાપાસૂન
મુક્ત આહેતો. તો કોણાલાહી જબાબદાર નાહી રા-
જાચી ઇચ્છા અભિમાન્ય આહે. રાજાવર અંતર્ગત વ
બાહ્ય શક્તીચે નિયંત્રણ નસતે. હે વિચાર ત્યાંની
માંડલે આહેત. યા વિચાર મ્હણજેચ સાર્વભૌમત્વા-
સાચા વિચાર આહે આહે આપણાસ મ્હણતા યેઈલ.

Scanned with CamScanner

(६) कायद्यासंबंधी विचार :- कायद्याचा विचार संकुचित नाही. शासनाच्या सर्व शाखांमध्ये मॅकेव्हलीची कायद्याची संकल्पना समाविष्ट आहे तो नैसर्गिक व दैवी कायद्यांना महत्व देत नाही. नागरिकां-पर्यंत सर्वसमावेश आहेत. राजाद्वारे / शासनाद्वारे त्याची निर्मिती करावी असे मॅकेव्हलीचे मत आहे.

(७) राजाला केलेला उपदेश / शासकाची / राजाची कर्तव्य :- मॅकेव्हलीने द प्रिन्स या ग्रंथाच्या तिसऱ्या भागातील 18 व्या अध्यायात राजाने / शासकाने कोणत्या परिस्थितीत कसे वर्तन करावे, कोणत्या नियमाचे पालन करावे ते सांगितले आहे त्यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो

(1) प्रजेच्या संपत्तीचे संरक्षण करणे :- राजाने प्रजेच्या संपत्तीचे रक्षण करणे हे त्याचे पहिले कर्तव्य आहे. मनुष्य हा स्वभावतःच संपत्तीचा लोभी असल्यामुळे त्याच्या संपत्तीचे संरक्षण केल्यास राज्य सुरक्षित राहू शकते. प्रजेच्या संपत्तीचे अपहरण राजाने कधीच करू नये. कारण व्यक्ती आपल्या वडिलांचा वध केलेला ~~सुद्धा~~ विसरू शकतो, परंतु संपत्तीचे अपहरण कधीच विसरत नाही असे त्याचे मत आहे.

(२) रूढी परंपरेचा आदर :- राजाने रूढी परंपरेत हस्तक्षेप करू नये शक्यतो त्याचा आदरच करावा. कारण प्रत्येक समाजातील रूढी परंपरेशी त्या व्यक्तीचे भावनिक नाते जडलेले असते त्यामुळे रूढी परंपरेला विरोध केल्यास विद्रोह होण्याची शक्यता असते

③ जनतेवर दरारा :- राजाबद्दल जनतेमध्ये कायमी भिती असावयास पाहिजे की त्यांनी तयार केलेल्या कायद्यांचे उल्लंघन जनता स्वप्नातही करू शकणार नाही. कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यास राजाने अत्यंत कठोरतापूर्वक शासन करावे.

④ सिंह व कोल्ह्याच्या गुणांचा समन्वय :- राजा सिंहासारखा शूर व कोल्ह्यासारखा धूर्त, कपटी असावा. त्याने मनात एक व ओठात दुसरेच असे वागणे गरजेचे असते. शौर्यामुळे प्रजेवर व परराष्ट्रावर प्रभाव पडतो व धूर्तपणामुळे कोणाचीही योजना यशस्वी करण्यास मदत मिळते.

⑤ निती-अनितीचा विचार करू नये :- राजाने त्याच्या वाटेल त्या मार्गाचा अवलंब करावा. त्यांनी निती-अनितीचा विचार करू नये. राजाने राज्यकारभार करताना धूर्त, कपटीपणाचा अवलंब करावा. मनात एक व तोंडावर एक असे वागावे. तसेच त्याच्याकडे शौर्यही असावे.

⑥ धार्मिक देखावा :- धर्माच्या निर्बंधापासून मॅकेव्हलीने राजाला मुक्त केले आहे. राजाने धार्मिक असणे आवश्यक नाही. पण राज्याच्या हितासाठी राजाने धर्माचा उपयोग करून घ्यावा. म्हणजेच पण धार्मिक देखावा करावा असे ते म्हणतात.

⑦ युद्धकालीन लुटीची विल्हेवाट :- राजाने युद्धात पराभव करून मिळविलेली सर्व संपत्ती स्वतःजवळ ठेवू नये. कारण त्यामुळे सैन्यामध्ये गैरसमज निर्माण होतो. ती संपत्ती सैन्यामध्ये वाटून टाकावी. त्यामुळे राजाबद्दल सैन्याच्या मनात आदराची

भावना निर्माण होते.

(8) सद्गुणांचा भास करावा:- चांगल्या राज्यकर्त्यामध्ये सद्गुणांचा भास निर्माण करण्याचे कौशल्य असावे. राजा सद्गुणी असण्याची गरज नाही लोकांना तो प्रजाहितदक्ष, दयाळू, संरक्षक, प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न वाटावयास पाहिजे परंतु राजाने राज्याच्या हितासाठी सद्गुणांविरोधी वर्तन करावे. राजाचा प्रत्येक शब्द हा त्याच्या सद्गुण असतो.

(9) कार्यक्रम पुरवा:- राजाने जनतेचे लक्ष शासन कार्यापेक्षा इतर कार्यात गुंतवून ठेवावे. शासन कार्याकडे लक्ष दिल्यास शासनातील दोष जनतेच्या लक्षात येतील. परिणामी शासनाच्या विरुद्ध वातावरण तयार होईल. म्हणून राजाने जनतेला संगीत, नृत्य, नाटक इ. कडे मग्न करावे.

(10) आर्थिक विकासाकडे लक्ष द्यावे:-

(11) त्वरित निर्णय घ्यावा

(12) भावनेच्या आहारी जावू नये

(13) साम, दाम, दंड, भेद याचा वापर करावा

(14) युद्ध सज्ज व आक्रमक असावे.

(15) शेजारी देशाशी योग्यवेळी आक्रमण करावे

अशाप्रकारे मॅकेव्हलीने वरिलप्रमाणे शासकांनी कशाप्रकारे वागावे याबाबत केलेला उपदेश थोडक्यात स्पष्ट करता येतो.